**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commcoop२०११@gmail.com

---

जा.क्र.४-सआ/कायदा व वैधा./नियम १०७ फ/वाजवी मुल्यांकन/कार्यपध्दती/ ०५ /२०२१ दिनांक १० /०१/२०२२

प्रति

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था ( सर्व )
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ( सर्व)
३) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ( सर्व)
४) अध्यक्ष / सचिव , महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स फेडरेशन लि. मुंबई , भारतीय क्रिडा मंदीर , ४ था मजला , वडाळा , मुंबई-४०००३१
५) अध्यक्ष / सचिव , दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑप.बँक्स असोसिएशन लि. मुंबई , शिल्पीन सेंटर , ४० , जी.डी. आंबेकर मार्ग , वडाळा , मुंबई ४०००३१
६) अध्यक्ष / सचिव , महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. सी.टी.सी. क्र.११९/ बी , प्रमिला अपार्टमेंट , तीसरा मजला , मॉडेल कॉलनी , शिवाजीनगर, पुणे-४११०१६
७) अध्यक्ष / सचिव , विदर्भ क्रेडीट को -ऑप सोसायटीज फेडरेशन लि. अमरावती , मेघदुत, बडनेरा रोड, राजापेठ, जि.अमरावती
८) अध्यक्ष / सचिव , महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.मुंबई, ६/६०३ दुर्गा कृपा को-ऑप हौसिंग सोसायटी लि. हनुमान चौक , नवघर रोड, मुलुंड ( पुर्व) मुंबई-४०००८१
९). अध्यक्ष / सचिव , पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. ऋतुरंग ,सी बिल्डींग,पर्वती, पुणे -४११००३

**विषय** :- महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जप्त करण्यात आलेल्या जंगम / स्थावर मालमत्तेचे वाजवी मुल्यांकन ठरविताना अवलंबावयाची कार्यपध्दती—
**संदर्भ** :- आयुक्तालयाचे सम क्रमांक परिपत्रक दिनांक २९/१२/२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन आयुक्तालयाकडील संदर्भीय दिनांक २९/१२/२०२१ रोजीच्या परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असुन त्याचे अवलोकन करावे.

उक्त परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने फेडरेशन व काही क्षेत्रीय कार्यालयाकडून स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतल्यानंतर सदर मालमत्तेचे वाजवी मूल्यांकन करण्यात येत असल्याचे अवगत करण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड) मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याचा हेतु असला पाहीजे. यासाठी नियमातील **नमुना “ झेड ”** मध्ये जशीच्या तशी नोटीस ऋणकोला देणे आवश्यक आहे. सदर नोटीसीनुसार ताबा घेतल्याचा पुरावा जोडल्यास मालमत्तेच्या वाजवी किंमतीबाबत निर्णय घेणे योग्य राहील.

**( अनिल कवडे )**
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था , महाराष्ट्र राज्य, पुणे.